महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २८ /२०२३ दि. १७/०२/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**संदर्भ** :– जा.क्र. पोउपआ/वावि/रस्ता दुरूस्ती परवानगी/५१५/२०२३, दि. १०/०२/२०२३

*****

**ज्याअर्थी,** कापूरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत ब्रॉडवे ऑटोमोबाईल्स पेट्रोल पंप ते विहंग इन हॉटेल या सेवा रस्त्यावर मलवाहिनी टाकण्यात येणार आहे. तसेच ड्रेनेज हाऊस कनेक्शन करण्यात येणार आहे. नमूद ठिकाणी खोदकाम करताना सदर रस्ता पूर्णपणे बंद करावा लागणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) घोडबंदर ठाणे वाहिनीवरील आर मॉलकडून विहंग हॉटेलकडील सर्व्हीस रोड मार्गे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **विहंग हॉटेल समोरील सर्व्हीस रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने विहंग हॉटेल येथून डावे वळण घेवून जोधपूर स्वीटस् समोरून कोलशेत रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) घोडबंदर ठाणे मुख्य वाहिनीवरून डावीकडे आर. बी. एल. बॅंक व एम. आय. शो रूम समोर यु टर्न घेवून सर्व्हीस रोड मार्गे विहंग हॉटेलकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **आर. बी. एल. बॅंक व एम. आय. शो रूम कट समोरील यु टर्न** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने नळपाडा सिग्नल येथून डावे वळण घेवून कोलशेत रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) कोलशेत रोडवरील जोधपूर स्वीटस् समोरून विहंग हॉटेलकडून डावे वळण घेवून सर्व्हीस रोड मार्गे आर. बी. एल. बॅंक व एम. आय. शो रूम मार्गे घोडबंदर ठाणे वाहिनीवर जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **विहंग हॉटेल समोरील सर्व्हीस रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने विहंग हॉटेल येथून उजवे वळण घेवून सर्व्हीस रोडने आर मॉल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसूचना दिनांक १७/०२/२०२३ पासून ब्रॉडवे ऑटोमोबाईल्स पेट्रोल पंप ते विहंग इन हॉटेल या सेवा रस्त्यावर मलवाहिनी टाकण्याचे आणि ड्रेनेज हाऊस कनेक्शनचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

– मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
– ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि कापुरबावडी, वागळे, राबोडी वाहतूक उप विभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.